# कै. रसिका महाविद्यालय, देवणी

## राष्ट्रीय सेवा योजना

"पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीच्या संवर्धन व स्वच्छताभारात अभियान साठी युवक / युवती शिबीर"

**शिबीर कालावधी दि. 14 / 02 / 2019 ते . 20 / 02 / 2019**

## शिबीर अहवाल

**पहिला दिवस : दि. 14 / 02 / 2019** वार गुरूवार रोजी शिबीरार्थीचे शिबीर स्थळ मौजे सावरगाव कडे सकाळी ठिक 11:30 वाजता प्रस्थान 12:00 वाजता शिबीर स्थळी आगमन निवास स्थळाची स्वच्छता करून निवास व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर ठिक 4:00 वाजता सरपंच व ग्रामस्थासोबत बैठक घेऊन शिबीरात करावयाच्या विविध प्रकारच्या कामाचे नियोजन करण्यात आले. या नियोजनात पुढील कामांचा समावेश करण्यात आला.

– कार्यकमाचे उद्घाटन.

– गावात पाणी फांउडेशन च्या वतीने घेण्यात येणाऱ्या वाटर कप स्पर्धा 2019 साठी जनजागरण.

– रोपवाटीकेची पुर्णतयारी करणे.

– ग्राम स्वच्छता करणे.

– बायोडायनामीक तयार करणे.

– पशु सर्व रोग निदान शिबीर घेणे.

– परसबाग तयार करणे.

– चार व्यवस्थापणाचे प्रात्याक्षीक दाखवुन जनजागरण करणे.

**कै. रसिका महाविद्यालयाच्या रासेयो शिबीरात रोपवटीकेची पुर्व तयारी** : सावरगाव येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीच्या संवर्धन व स्वच्छ भारत अभियान साठी युवक शिबीर घेण्यात येत आहे. आज या शिबीर रोपवाटीका तयार करण्यासाठी 1000 मातीच्या पिशव्या तयार करण्यात आल्या. या पिशव्यामध्ये बीया रूजवुन प्रत्येक कुटूंबास त्याचे वाटप करण्यात येणार आहे. या कामासाठी सावरगावचे सरपंच, ग्रामसेवक तुकाराम सावरे, पानी फाउंडेशनचे प्रतीनिधी राजेंद्र जाधव, निलेश गुळे, जोगदंड, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. पी. आर. मोरे, डॉ. गोपाळ रोमानी, डॉ. श्रीधर बनसोडे यांच्यासह सर्व स्वंयसेवक यांनी मेहनत घेतली.

**दुसरा दिवस दि. 15/02/2019** वार शुक्रवार रोजी प्रातःकिया आटोपुन योगासणे व प्राणायम करण्यात आले यानंतर आल्पोपहार झाल्यानंतर ठिक 08:00 वाजता गावात प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीत जनावरांचे सर्व रोग निदान शिबीरात जनावरांची तपासणी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले. यानंतर पशुवैधकिय महा. उदगीर येथील डॉ. अनिल भिफाणे यांनी चारी व्यवस्थापणाचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. त्यानंतर पशु सर्वरोग निदान शिबीरा अंतर्गत गोचीड निर्मुलन, वंध्यत्व निवारण, गर्भतपासणी खच्चिकरण इ. तपासणी करून उपचार व मार्गदर्शन डॉ. अनिल भिफाणे व त्यांच्या टिमकडुन झाले. त्यानंतर लगेचच शिबीराच्या उद्घाटनाचा कार्यकम घेण्यात आला. या कार्यकमासाठी मा. अध्यक्ष म्हणुन संस्था सचिव गजानन भोपणीकर, उद्घाटक म्हणुन उदे्श्वर शिक्षण संस्थेचे संस्था सचिव मा. श्री. काशिनाथ बिरादार हे उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थिती मध्ये प्राचार्य डॉ. कुणाल बडदे, सरपंच सौ. रंजना बोरोळे, ग्रामसेवक काशिनाथ बिरादार यांच्या सह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यकमात डॉ. अनिल भिकाणे सरांची मार्गदर्शन केले.

**तिसरा दिवस (16/02/2019)** दि. 16/02/2019 वार शनिवार रोजी दैनदिन प्रातःकिया आटोपुन योगासने व प्राणायम करण्यात आला. यानंतर अल्पेपहार करून ठिक 08:00 ते 12:00 या कालावधीत श्रमदान करण्यात आले. या श्रमदानात रोपवटीकेची पुर्वतैयारी (रोपे लावण्यासाठी मातीच्या पिशव्या भरण्यात आल्या) त्यानंतर दुपारचे जेवण व विश्रांती करण्यात

आली. विश्रांती नंतर ठिक 03:00 वाजता डॉ. आनंत शिंदे (कै. बापुसाहेब एकंबेकर महाविद्यालय, उदगीर) यांचे व्यक्तीमत्व विकासात रासेयो चे योगदान या विषयावर मार्गदर्शन झाले. तसेच 04:00 वा प्रा. अंकुश भुसावळे यांचे सामाजीक माध्यमाचे समाजावर होणारे परिणाम या विषयावर मार्गदर्शन झाले. 05:00 ते 06:00 मैदानी खेळ घेण्यात आले. त्यानंतर संध्याकाळचे जेवन व बौध्दीक चर्चा करण्यात आली.

**चौथा दिवस (17/02/2019) दि. 17/02/2019** रोजी नियमित प्रातःविधी ओटोपुन योगासणे व प्राणायम करण्यात आले. त्यानंतर ठिक 08:00 वाजता श्रमदानास सुरूवात झाली. या मध्ये ग्रामस्वच्छता करण्यात आली. दुपारच्या सत्रात ठिक चार वाजता प्रा. डॉ. भालचंद्र करंडे यांचे युवका समोरील आव्हाने या विषयावर व्याख्यान झाले. त्यानंतर 05:00 ते 06:00 या वेळात मैदान खेळ घेण्यात आले. तसेच संध्याकाळचे जेवन झाल्यावर विविध विषयावर बौध्दीक चर्चा करण्यात आली.

**पाचवा दिवस (18/02/2019) दि. 18/02/2019** सोमवार रोजी प्रातःविधी झाल्यानंतर योगासणे व प्राणायम अल्पोपहार घेऊन ठिक 08:00 वाजता श्रमदानास सुरूवात करण्यात आली. श्रमदानाच्या माध्यमातुन गावात ग्राम स्वच्छता करण्यात आली सोबतच परसबाध म्हणजेच ज्या ठिकाणी पाणी वाहुन जात असेल परंतु शोषखंडा तयार करणे शक्य नाही अशा ठिकाणी झाड लावणे अशा प्रकारे परसबाग ही संकल्पना राबविली.

त्यानंतर दुपारच्या सत्रात प्रा. डॉ. भ. ई. तगांवार प्रा. अभय पाटील, व डॉ. शिवकुमार कस्तुरगे यांची व्याख्याने आयोजीत करण्यात होती. व्याख्यानाचा कार्यक्रम संपल्यानंतर मैदानी खेळ व त्यानंतर संध्याकाळाचे जेवन आटोपुन विविध विषयावर बौध्दीक गट चर्चा, इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. गोपाल सोमाणी यांनी केले. प्रास्थाविक कार्यक्रमाधिकारी डॉ. पी. आर. गोरे यांनी केले. तर आभार प्रदर्शन उप प्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी केले.

**सहावा दिवस (19/02/2019) दि. 19/02/2019** मंगळवार रोजी प्रातःविधी योगासणे, प्राणायम व अल्पोपहार घेऊन ठिक 08:00 वाजता श्रमदान करण्यात सुरूवात झाली. आजचा

श्रमदानात वाटर कप स्पर्धा 2019 च्या पुर्वतयारीच्या अनुषंगाने रोपवाटीका तयार करण्यासाठी रोपे लावण्यासाठी मातीच्या पिशव्या भरण्यात आल्या. छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे पुजन पुष्पहार अर्पण करून

सोबतच रक्ततपासणी शिबीर सुध्दा आयोजित करण्यात आले होते या शिबीराच्या माध्यमातून गावातील लोकांची मोफत रक्त तपासणी करून आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर दुपारच्या सत्रात ठिक चार वाजता प्रा. डॉ. पेडगे एस. एस. यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. या व्याख्याना नंतर मैदानी खेळ बौध्दीक गट चर्चा इत्यादी नियमित कार्यक्रम पार पडले.

**सातवा दिवस (20/02/2019) दि. 20/02/2019** बुधवार नित्याप्रमाणे प्रातःविधी योगासणे, प्राणायम व अल्पेपहार झाल्यावर समारोपाची तयारी करण्यात आली. दुपारी ठिक 12:00 वाजता समारोपास सुरूवात झाली समारोप कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणुन डॉ. शिवकुमार डोंगरे उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणुन देवणीचे तहसिलदार जिवककुमार कांबळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कुणाल बडदे, सरपंच सौ. रंजना सुग्रीव बोरोळे, गावातील प्रतिष्ठित गावकरी तसेच महाविद्यालयाचे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

समारोपाच्या कार्यक्रमानंतर ठिक 05:00 वाजता शिबीर स्थळावरून महाविद्यालयाकडे प्रस्थान करण्यात आले.

आशाप्रकारे दि. 14/02/2019 ते 20/02/2019 या सात दिवसाचे पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीच्या संवर्धन व स्वच्छताभारात अभियान साठी युवक शिबीर यशस्वी दिल्या पार पडले.

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै. रसिका महाविद्यालय, देवणी

प्राचार्य
कै. रसिका महाविद्यालय, देवणी
ता. देवणी जि. लातूर